जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 1580 /२०२३
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 30/11/2023

# दक्षता विभागाचे परिपत्रक -७

विषय- बृहत्सूची समितीमार्फत भाडेकरु/ रहिवाशी /अर्जदार यांना वारसहक्क प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर पात्र न करणेबाबत.

प्राधिकरण ठराव क्र.६५२०,दि.०३.०३.२०११ नुसार उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु / रहिवाशी यांची पात्रता / अपात्रता निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

परंतु, असे निदर्शनास आले आहे की, बृहत्सूची समिती भाडेकरु / रहिवाशी / अर्जदार यांना काही अटी व शर्तींच्या अधिन राहून पात्र करतात.

प्राधिकरण ठरावाप्रमाणे भाडेकरु / रहिवाशी / अर्जदार यांचेकडील कागदपत्रे पाहून बृहत्सूची समितीने अर्जदारास पात्र अथवा अपात्र करणे हे दोन पर्याय आहेत. जर अर्जदार यांचेकडे सुनावणीच्यावेळी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसतील तर त्यांना समितीने सुनावणीची दुसरी संधी द्यावी.तथापि, अटी व शर्तींच्या अधिन राहून पात्र करु नये. तसेच अर्जदाराने आधी वारसहक्क प्रमाणपत्र उपलब्ध करावे.त्यानंतर त्यांना पात्र करण्याची कार्यवाही समितीने करावी. सबब, वारसहक्क प्रमाणपत्र देण्याच्या अटीवर अर्जदार यांना पात्र करण्यात येऊ नये.

तसेच, असेदेखील निदर्शनास आले आहे की, काही अर्जदार बनावट/ खोटे कागदपत्रे सादर करतात. परंतु, सदर कागदपत्रांची सत्यता तपासण्याचे काम बृहत्सूची समितीचे आहे. त्यानुसार बृहत्सूची समितीने उचित कार्यवाही करावी.

सदर परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

o/c

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
सहमुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
उपमुख्य अधिकारी [पुगा], मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
उपमुख्य अधिकारी [संगा], मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

प्रत: उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा यांना माहितीसाठी.